# झंझावात

*जगलो असाच कसातरी ओठातल्या ओठात मी*
*आता कुठे बोलायला केली खरी सुरुवात मी!*

*झाले कशाचे बोलणे केले जरा मन मोकळे!*
*(जे राहिले सांगायचे ते टाळले अजिबात मी)*

*माहीतही नाही मला आलो इथे केव्हा कसा*
*मीही अताशा ऐकतो...दिसलो म्हणे इतक्यात मी*

*बसुनी गळेकापूंसवे मी काल मैफल जिंकली*
*कटला होता जरी गळा उठलो अचानक गात मी*

*कुठल्याच दारी मी कधी नेली न कागाळी तुझी*
*नाराज आयुष्या तुझी घालू कशी रुजवात मी?*

*तुमची करा आरास अन् तुमचे तुम्ही लावा दिवे*
*तुमच्यात येऊ मी कसा? बदनाम झंझावात मी !*

*मजला असे पाहू नका...रस्त्यावरी थांबू नका*
*- धुंडाळतो आहे इथे माझा रिकामा हात मी!*

***माझ्या भविष्याची मला नाही जराही काळजी***
***उमटेन या धरतीवरी.... चमकेन त्या गगनात मी!***

*सुरेश भट*
*एल्गार*

*जिन्दगी से यही गिला है मुझे*
*तू बहोत देर से मिला है मुझे!*
*माझ्या जीवनाविषयी माझी एवढीच तक्रार आहे की ही जिन्दगी फार उशिरा मला भेटली आहे.*

*आपल्याला "आपला" मार्ग सापडला की जगण्यातली मजा काही वेगळीच अनुभवता येते. खूप वेळा हा मार्ग शोधतांना आपण चाचपडतो.*
*सुरेश भट खूप मनस्वी आयुष्य जगले. त्यांचा मार्ग त्यांना फार लवकर गवसला होता आणि त्या मार्गावरून ते अजिबात ढळले नाहीत.*
*स्वतःला जे वाटले ते त्यांनी स्पष्टपणे मांडले, टीकेची पर्वा न करता. मराठी साहित्यिक, समीक्षकांनी त्यांची म्हणावी तशी दखल घेतली नाही. बहुतेक वेळा त्यांच्या वाट्याला उपेक्षा आणि हेटाळणीच आली.*
*या कवितेतील काही ओळींमध्ये याचेच प्रतिबिंब पडले आहे असे वाटते.*

*मन्दार*